महाराष्ट्र पोलीस

पोलीस उप आयुक्त वाहतुक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ ८१ /२०२२ — दि. २३ /०९/२०२२

**वाहतुक नियंत्रण अधिसुचनाः–**

**ज्याअर्थी**, ठाणे शहरात सालाबादाप्रमाणे ठाणेनगर वाहतूक उपविभागाच्या हद्दीत यावर्षी ही दि. २६/०९/२०२२ ते दि. ०५/१०/२०२२ या कालावधीत **टेंभीनाका** या ठिकाणी **नवरात्र उत्सव** दरम्यान दुर्गादेवीचे दर्शन घेण्यासाठी भाविकांची मोठया प्रमाणात गर्दी होत असते, त्यामुळे सदर परिसरात वाहतुक कोंडी होवू नये, वाहतुक सुरळीत व सुनिश्चित रहावी, जनतेची गैरसोय होवू नये याकरीता आम जनतेच्या सोईसाठी,

**त्याअर्थी**, मी गणेश गावडे पोलीस उप आयुक्त, मुख्यालय २, ठाणे शहर अतिरिक्त कार्यभार पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर म्हणून,महाराष्ट्र शासन गृहविभाग एम.व्ही.ए. –११६/सी.आर/३७/टी.आर. दि.०७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून खालील प्रमाणे वाहतूक नियंत्रण अधिसुचना जारी करीत आहे

**प्रवेश बंद–** १) ठाणे स्टेशन येथुन सिव्हिल हॉस्पीटलकडे जाणा–या सर्व वाहानांना (टी.एम.टी.व एस.टी.बसेस सह) **टॉवर नाका** येथे **प्रवेश बंद** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग–** सदरची वाहने ही टॉवरनाका येथुन डावीकडे वळून – गडकरी सर्कल–दगडीशाळा चौक–अल्मेडा चौक मार्गे पुढे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद–** २) गडकरी सर्कल कडून टॉवर नाक्याकडे जाणाऱ्या सर्व वाहनांना (टी.एम.टी.व एस.टी.बसेस) **परफेक्ट ड्रायव्हिंग स्कुल** (गडकरी सर्कल) येथे **प्रवेश बंद** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग–** सदरची सर्व वाहने व टि.एम.टी. बसेस हया गडकरी सर्कल–दगडीशाळा चौक मार्गे पुढे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद–** ३) चरईकडुन एदलजी रोडने भवानी चौक टेंभीनाक्याकडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **धोबी आळी क्रॉस** ( मे. फेअर अपार्टमेंन्ट ) येथे **प्रवेश बंद** करण्यात येत आहे

**पर्यायी मार्ग–** सदरची सर्व प्रकारची वाहने ही धोबी आळी क्रॉस (मे. फेअर अपार्टमेंन्ट) पर्यंत सरळ जावून डावीकडे वळून धोबीआळी चौक–डॉ.सोनुमिया रोड– धोबीआळी मशिद–सिव्हिल हॉस्पीटल मार्गे पुढे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद–** ४) कोर्टनाका बाजुकडुन टेंभीनाका बाजुकडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना कलेक्टर ऑफीस, डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा येथे **प्रवेश बंद** करण्यात येत आहे

**पर्यायी मार्ग–** सदरची सर्व वाहने डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा येथुन डावीकडे वळून–सुभाष पथने–जांभळी नाका–टॉवर नाका –मूस चौक–ठाणे रेल्वे स्टेशन, डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक मार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद–** ५) दगडी शाळा बाजुकडुन विर सावरकर रोड मार्गे टेंभीनाक्याकडे जाणाऱ्या सर्व वाहनांना **दांडेकर ज्वेलर्स** (यशोदीप क्लास) येथे **प्रवेश बंद** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग–** सदरची वाहने ही दांडेकर ज्वेलर्स (यशोदिप क्लास) येथुन डावीकडे वळुन उत्तम मोरेश्वर मार्ग– अहिल्यादेवी गार्डन – धोबीआळी क्रॉस (मे फेअर अपार्टमेंट) सरळ जावुन धोबीआळी चौक– सोनुमिया रोड–धोबीआळी मशिद– सिव्हील हॉस्पीटल मार्गे पुढे इच्छीत स्थळी जातील.

**प्रवेश बंद–** ६) मिनाताई ठाकरे चौकाकडुन सिव्हील हॉस्पीटल कार्नर मार्गे टेभीनाका व स्टेशनकडे जाणा–या सर्व वाहनांना **सिव्हील हॉस्पीटल कार्नर** कडुन टेंभीनाक्याकडे जाण्यास **प्रवेश बंद** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग–** सदरची वाहने ही सिव्हील हॉस्पीटल कॉर्नर–जीपीओ नाका–कोर्ट नाका–आंबेडकर पुतळा येथुन डावीकडे वळुन जाभंळी नाका मार्गे पुढे इच्छीत स्थळी जातील.

**प्रवेश बंद–** ७) धोबी आळी चौक – धोबी आळीक्रॉस – अहील्यादेवी गार्डन – उत्तम मोरेश्वर आग्रे मार्ग – दांडेकर ज्वेलर्स या मार्गे जाण्यास सर्व प्रकारच्या वाहनांना **धोबी आळी चौक** येथे **प्रवेश बंद** करण्यात येत आहे.

(कृ.मा.पा.)

CS CamScanner

**पर्यायी मार्ग–** सदरची वाहने ही धोबी आळी चौक–चरई टेलीफोन एक्सेंज–एदलजी रोड–एलबीएस रोड मार्गे पुढे इच्छीत स्थळी जातील.

**नो पार्किंग –** ८) दगडी शाळा–सेंट जॉन बॉप्टीस्ट हायस्कुल (जुना मुबई–आग्रा रोड) दांडेकर ज्वेलर्स–उत्तम मोरेश्वर आंग्रे मार्ग–अहील्यादेवी गार्डन–धोबीआळी क्रॉस–धोबी आळी चौक–डॉ सोनुमिया रोड ते सिव्हील हॉस्पीटल कॉर्नर या दरम्यान मधील परीसरात रस्त्याच्या दोन्ही बाजुस सर्व प्रकारच्या वाहनांना पार्कीग करण्यास मनाई करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग–** ९) हरिनिवास नाक्याकडून येणारी वाहने तीन पेट्रोल पंपावरून सरळ गजानन चौक–घंटाळी देवी मंदिर रोड कडे जाण्यास **प्रवेश बंद** करण्यात येत आहे.

**नो पार्किंग –** सदरची सर्व प्रकारची वाहने ही तीन पेट्रोल येथून वंदना क्रॉस मार्गे पुढे इच्छीत स्थळी जातील. तसेच देवीचे मुर्ती विसर्जन करण्याकरीता येणारी वाहने वंदना क्रॉस येथून उजवीकडे वळण घेवून प.ना. गाडगीळ चौक येथे डावीकडे वळण घेवून तलावपाळी विसर्जन घाटाकडे जातील.

सदरची वाहतूक अधिसूचना ही दि. २६/०९/२०२२ ते दि. ०५/१०/२०२२ या कालावधीत सायंकाळी १६.०० ते रात्रौ २४.०० वाजे पावेतो अंमलात राहिल. सदरची वाहतूक अधिसुचना ही पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागु होणार नाही.

(गणेश गावडे)
पोलीस उप आयुक्त, मुख्यालय ०२, ठाणे शहर
अतिरिक्त कार्यभार
वाहतूक विभाग, ठाणे शहर

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.

२/– सदरची अधिसुचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सादर**

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे शहर
मा. जिल्हाधिकारी, ठाणे.
मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका,ठाणे.
मा. पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–१,ठाणे, परिमंडळ–५ वागळे इस्टेट व विशेष शाखा,ठाणे

**प्रत कार्यवाहीसाठी :–**
प्रादेशिक परिवहन अधिकारी ठाणे.
परिवहन व्यवस्थापक,ठाणे महानगरपालिका, ठाणे, बृहन्मंबई व वसई–विरार महानगरपालिका.
नियंत्रण कक्ष अधिकारी, ठाणे
विभाग नियंत्रक,महाराष्ट्र राज्य परिवहन, ठाणे

प्रत :– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे,ठाणे शहर
२/– सदरची अधिसुचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

प्रत :– समन्वय अधिकारी, ९ ए.एस.कक्ष,ठाणे
२/– सदरची अधिसुचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

प्रत :– सपोआ वाहतूक विभाग, ठाणे व प्रभारी अधिकारी, ठाणेनगर, नौपाडा, कोपरी वाहतूक उपविभाग.
२/– म.न.पा.ठाणे च्या संबंधीत अधिकाऱ्यांकडून आवश्यक सुचना फलक लावून घ्यावीत.

CamScanner